नि.दि.दावा. क्र. २१/२०२०
विश्वास वि. वसंत व इतर.
MHKO1500017222020.

## निशाणी क्रमांक ३८ व ४३ वरील एकत्रीत आदेश.

**१.** वादींनी नि. क्र.३८ वरील अर्ज मयत प्रतिवादी क्र. १ च्या विरोधात झालेला अवसानाचा आदेश रद्द करुन वारस अभिलेखावर आणण्यासाठी झालेला विलंब माफ करण्यासाठी आणि नि. क्र.४३ चा अर्ज त्याचे वारस पटलावरती घेण्यासाठी दाखल केलेला आहे. न्यायाच्या दृष्टीने चर्चेची पुनरावृत्ती टाळण्यासाठी दोन्ही अर्ज एकत्रीतपणे आदेशासाठी घेतलेले आहेत.

**२.** वादींचे थोडक्यात कथन की, दावा प्रलंबित असताना प्रतिवादी क्र.१ चे दि. ०७.१२.२०२३ रोजी निधन झालेले आहे. वादींनी प्रस्तूत दावा निरंतर मनाई हुकूमासाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र.१ मयत झाल्याची बाब दि.२२.०७.२०२४ रोजी प्रतिवादींनी दिलेल्या पुरसीसी वरुन वादींच्या निदर्शनास आलेली आहे. दाव्यातील गुंतागुंत टाळण्यासाठी मयत प्रतिवादी क्र.१ चे वारस पटलावरती आणणे गरजेचे आहे. वादींना सदर वारस पटलावरती आणण्यासाठी ५ महिन्यांचा विलंब झालेला आहे. सदर मयत प्रतिवादी क्र.१ चे वारस पटलावरती घेणे आवश्यक असून त्यामुळे प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. सबब, वरील अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

**३**. प्रतिवादींना पुरेशी संधी देऊन देखील त्यांनी लेखी म्हणणे दाखल केलेले नसल्यामुळे प्रस्तूतचे अर्ज त्यांच्या लेखी म्हणण्या शिवाय गुणदोषावरती आदेशासाठी घेण्यात आलेले आहेत.

**४**. वादीच्या वकिालंचा विस्तृत युक्तिवाद ऐकला. वादीच्या वकिलांनी प्रस्तूत अर्जाद्वारे वादींनी केलेली मागणी दाव्याच्या अंतिम न्यायनिर्णयास उपयुक्त असल्याने न्यायाच्या दृष्टीने अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

**५**. वादीने मयत प्रतिवादी क्र.१ च्या मृत्यूपत्राची प्रत सादर केलेली आहे. इतर प्रतिवादींनी प्रतिवादी क्र.१ मयत झाल्याची बाब न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिलेली आहे. प्रतिवादी क्र.१ ही दि.०७.१२.२०२३ रोजी गडहिंग्लज येथे मयत झालेला आहे. वादी पेरणोली येथे राहत असल्यामुळे त्याला प्रतिवादी क्र.१ च्या मृत्यूबाबत आवश्यक माहिती व कागदपत्रे मिळू शकली नाही ही बाब विश्वसनीय वाटते. तसेच प्रतिवादींनी देखील विलंबाने सदर बाब न्यायालयाच्या निदर्शनास आणलेली आहे.

**६**. वादीने मयत प्रतिवादी क्र.१ चे वारस त्याच्या मृत्यूनंतर ९० दिवसांमध्ये किंवा त्यापुढे अतिरिक्त ६० दिवसांच्या विलंबाने पटलावरती आणणे गरजेचे होते. प्रस्तूत दाव्यात मयत प्रतिवादी क्र.१ बाबत अवसानाचा आदेश अद्याप पर्यंत पारीत करण्यात आलेला नाही. तरी झालेल्या विलंबाचा विचार करता, प्रस्तूत दावा हा मयत प्रतिवादी क्र.१ साठी अवसानायात झालेला आहे.

**७**. वादींनी प्रस्तूतचा दावा निरंतर मनाईसाठी दाखल केलेला असून मयत प्रतिवादी क्र.१ च्या वारसांचे हितसंबंध गुंतलेले असून त्यांना दाव्यात आवश्यक पक्षकार करणे गरजेचे आहे. वादीचा अर्ज मंजूर केल्यामुळे प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. सबब, दाव्याचे स्वरुप विचारात घेता न्यायाच्या दृष्टीने आवश्यक असलेल्या बाबींचा विचार करता खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे,

## आदेश

**१**. अर्ज मंजूर करण्यात येतात.

**२**. प्रतिवादी क्र.१ च्या विरोधातील अवसानाचा आदेश रद्द समजला जाऊन त्याचे वारस पटलावरती घेण्यासाठी मंजूरी दिली जात आहे.

**३**. वादीने अर्जातील प्रतिवादी क्र.१ चे वारस समाविष्ट करुन दाव्याची सुधारीत प्रत दाखल करावी.

४. वादी व प्रतिवादींनी आदेशाची नोंद घेऊन पुर्तता करावी.

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

**(आर. पी. थोरे)**

जे. ओ. कोड–एम.एच.०२८९७

दिनांक – ०३.०३.२०२५.  दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, आजरा.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते